सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्र.एक्स-४ मुख्य लेखाशीर्ष “७६१०-शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे” या लेखाशीर्षातंर्गत निधी वितरीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: मबाआ-२०१९/प्र.क्र.३०/का-७अ
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २२ जुलै, २०१९.

संदर्भ:- १) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ८ जुलै, २०१९.
२) शासन पत्र,महिला व बाल विकास विभाग क्र. बीजीटी- २०१९/प्र.क्र. २९/का-४, दि.११ जुलै, २०१९.

प्रस्तावना:

महाराष्ट्र विनियोजन विधेयक,२०१९ यांच्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमास विधानमंडळाने मंजूरी दिली असून ते महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-०८ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग ४, दिनांके ४ जुलै, २०१९ यामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुषंगाने वित्त विभागाच्या उपरोक्त दिनांक ८.७.२०१९ च्या परिपत्रकान्वये सन २०१९-२० च्या माहे डिसेंबर पर्यंतचा नऊ महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकलिप्त निधी एकुण वार्षिक तरतुदीच्या ६० % च्या मर्यादेत वितरित करण्यास संदर्भाधीन क्रमांक-१ येथील दिनांक ८.७.२०१९ च्या परिपत्राकन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

२. त्यानुसार वित्त विभागाच्या सदर परिपत्रकातील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच नियोजन व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित निकष, वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजन यांचे पालन करुन संबंधित योजनांबाबतचे निधी वितरणाचे/ खर्चास मान्यता देण्याचे आदेश स्वतंत्ररित्या संबंधीत कार्यासनानी निर्गमित करण्याच्या सूचना संदर्भाधीन क्रमांक-२ येथील दिनांक ११/७/२०१९ च्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. त्यानुसार महिला व बाल विकास विभागातंर्गत मुख्य लेखाशीर्ष ७६१०-शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे या लेखाशीर्षाखाली अनुज्ञेय होणारा निधी वितरित करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक- १ येथील दिनांक ८.७.२०१९ रोजीच्या परिपत्रामधील तरतुदीनुसार माहे डिसेंबर,२०१९ अखेर पर्यतंच्या ९ महिन्याचा खर्च भागविण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्रमांक-एक्स-४ मुख्य लेखाशीर्ष ७६१०-शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे, **(००)(०१)** घरबांधणी अग्रिमे (अनिवार्य) **७६१० १४७७,** ५५ -कर्जे व आगाऊ रकमा या लेखाशीर्षांतर्गत रु. **१८६६७/-** (अक्षरी रुपये एक कोटी श्याऐंशी लाख सदुसष्ट हजार फक्त) एवढा निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे हे राहतील त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. त्यानुसार आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे यांनी वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-१ येथील दिनांक ८.७.२०१९ परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या तपासणी सूचीतील बाबींची, केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचनांचे तसेच यासंदर्भात नियोजन विभाग व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित निकष, वित्तीय अधिकाराचे प्रत्यायोजन यांचे काटेकोर पालन करावे.

३. याबाबत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता वरील लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला निधी खर्च होईल व त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे यांनी घ्यावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक ८.७.२०१९ च्या परिपत्रकामधील तरतुदीच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०७२२१५२१०८३९३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing
Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.08.07 12:07:44 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय,पुणे
२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
३) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
४) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद (आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
५) सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
६) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर
८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी(आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
९) सर्व तालुका कोषागार अधिकारी(आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
१०) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी(आयुक्तालय, महिला व बाल विकास,पुणे मार्फत)
११) कार्यासन(व्यय-६/अर्थसंकल्प-७) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) कक्ष अधिकारी(का.४), महिला व बाल विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१३) निवड नस्ती-का-७ अ